# उप वनसंरक्षक, आलापल्ली वन विभाग आलापल्ली यांचे कार्यालय.

दुरध्वनी क्रमांक :०७१३३-२६६४३३, फॅक्स क्रमांक ०७१३३-२६६४३३ **Email :** dycfalpli@gmail.com


सुधारीत आदेश

विषय :- वनजमिन - गडचिरोली
प्रशासकिय इमारत व पोलिस अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी निवासस्थान बांधकामासाठी मौजा येलचिल ता. अहेरी जि.गडचिरोली येथिल २.०० हे. वनजमिन वळती करणेबाबत.

क्रमांक :- कक्ष-७/सर्व्हे/जमिन/ 2854
आलापल्ली, दिनांक - 15/5/20

प्रति,

पोलिस अधिक्षक,
गडचिरोली

संदर्भ :- १.महाराष्ट्र शासनाचे आदेश क्र. एफएलडी-२०१९/प्र.क्र.१०८/फ-१० मंत्रालय, मुबंई दि. २५.४.२०१९
२. या कार्या.पत्र क्र. कक्ष-७/सर्व्हे/जमिन/२८० दि.७.५.२०१९
३. आपले कार्या.पत्र.क्र. पोअग/पशा-२अ/वनजमिन येलचिल /एनपीव्ही/२०२० दि. १३.३.२०२०

*****

विषयांकित संदर्भाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, मौजा येलचिल ता. अहेरी जि.गडचिरोली येथिल पोलिस मदत केंद्र, येलचिल करीता प्रशासकिय इमारत व पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे निवासस्थाने, प्रशासकिय इमारत मोर्चा बांधकाम करण्याकरीता सर्व्हे क्र. १० मधील २.०० हे. आर जागेच्या प्रस्ताव संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये तत्वता: मंजुरी प्रदान करण्यात आलेली असुन मंजुरी पत्रात पर्यायी वनीकरणा संबधातील निधी भरण्यासंबधाने संदर्भीय पत्र क्र.२ अन्वये ११,०७,३३५.५३ रुपये अट क्र. ४ मध्ये नमुद करण्यात आलेले होते. मात्र सदर अट संदर्भीय पत्र क्र. १ मध्ये नमुद नसल्यामुळे पर्यायी वनीकरणाची अट व रक्कम या आदेशान्वये रद्द करण्यात येत आहे.

प्रकल्प यंत्रणेकडुन फक्त नुक्त वर्तमान मुल्य (NPV) १६,०६,०००/- ची रक्कम आरटीजीएस प्रणाली द्वारे कॉर्पोरेशन बॅक, सि.जी.ओ. कॉम्पलेक्स, लोधी रोड नवी दिल्ली- ११०००३, आयएफएससी कोड- सीओआरपी - ०००03७१ खाता क्र. ०३७१००१०१०-२५२१८ या खात्यात जमा करावी व आर.टी.जि.एस. ची मुळ पावती या कार्यालयास पुर्तता अहवाला सोबत जोडुन या कार्यालयास सादर करावे, जेणे करुन तत्वता: मंजुरीच्या अटी पुर्ण केल्याबाबत संबधीत प्रकल्प यंत्रणे कडुन अहवाल प्राप्त होताच, अंतिम मंजुरी करीता प्रस्ताव सादर करण्यात येईल, या बाबत नोंद घेण्यात यावी.

सहपत्र :- वरील प्रमाणे.

उप वनसंरक्षक,
आलापल्ली वनविभाग,आलापल्ली

प्रतिलिपी :- मा.मुख्य वनसंरक्षक (प्रा.) गडचिरोली यांना माहितीस व पुढील कार्यवाहीस सविनय सादर

उप वनसंरक्षक,
आलापल्ली वनविभाग,आलापल्ली